महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा.क्र. औसंवि/ब/रेकॉर्ड्स/२५०३३ दिनांक : ०४/०८/२०२५

# परिपत्रक

महावितरण कंपनीच्या २० व्या वर्धापन दिनाचे निमित्ताने संपूर्ण राज्यामध्ये विद्युत सुरक्षा विषयी जनजागृती कार्यक्रम आयोजित करून अपघाताचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने शुन्य अपघात महावितरण... शुन्य अपघात महाराष्ट्र... ही संकल्पना दि. ०१ ते ०६ जून २०२५ या काळात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

विविध स्तरावर विद्युत सुरक्षा व मॅरेथॉन रन फॉर सेफ्टी तसेच विज बचत विषयी रॅली काढणे, सगळ्या ग्राहकांना विद्युत सुरक्षा विषयी SMS व E-mail पाठविणे, विद्युत सुरक्षिततेबाबत ऑनलाईन क्वीझ स्पर्धा आयोजित करणे, इत्यादी कार्यक्रमाचा समावेश होता.

**वीज क्षेत्रामध्ये एखाद्या वीज कंपनीने इतक्या मोठ्या प्रमाणात विद्युत सुरक्षेबाबत समाजामध्ये जनजागृती करण्याची ही इतिहासामधील पहिलीच वेळ असल्यामुळे सदर बाबींची नोंद आशिया आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस् यांनी घेतली असून, आशिया बुक ऑफ रेकॉर्डस् आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस् यांच्या वतीने महावितरण कंपनीस खालील ०५ प्रकारचे TITLE OF RECORDS ने दि. ११/०८/२०२५ रोजी दुपारी ०३:०० वाजता सन्मानित करण्यात येणार आहे.**

TITLE OF RECORDS

I. Largest Multi - Location Electrical Safety Awareness Rally
II. Maximum SMS and Emails Sent to Consumers for Creating Awareness on Electrical Safety.
III. Maximum Participation in an Online Quiz Contest on Electrical Safety
IV. Maximum People Pledged to Raise Awareness on Electrical Safety
V. Maximum People Participation in a Marathon - Run For Safety to Promote Electrical Safety Awareness

महावितरण कंपनीस उपरोक्त TITLE OF RECORDS **(सन्मान) हे आशिया आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस् यांच्या मार्फत देण्याचा कार्यक्रम दि. ११/०८/२०२५ रोजी दुपारी ०३:०० वाजता प्रकाशगड, प्रेक्षागृह येथे होणार आहे.**

सबब, सांघिक कार्यालयात कार्यरत असलेल्या महावितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सदरहू कार्यक्रमास बहूसंख्येने उपस्थित राहावे.

(परेश भागवत)
**कार्यकारी संचालक (मासं)**

प्रत सविनय सादर :-
मा. संचालक - संचालन / वित्त / वाणिज्य / प्रकल्प / मासं, महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.

प्रत सस्नेह :-
सर्व कार्यकारी संचालक, महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.

प्रत रवाना :-
१. सर्व विभाग प्रमुख, महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.
- - सदरहू कार्यक्रमाकरीता बहूसंख्येने उपस्थित राहण्याबाबत आपल्या विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना निर्देशीत करण्यात यावे.
२. मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा), एकलहरे, नाशिक.
३. विशेष कार्य अधिकारी, (मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांचे), मुंबई.

प्रत :-
नोटीस बोर्ड -सर्व मजल्यांवर.